सार्वजनिक आरोग्य विभागाकडून नविन पदभरती करताना तसेच, पदोन्नतीने पदस्थापना देतांना प्राधान्याने आदिवासी भागातील रिक्त पदे भरण्याबाबतचे धोरण...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायप्र-२०२५/प्र.क्र. ११५२/सेवा-१
दहावा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, क्रॉफर्ड मार्केट जवळ,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय,मुंबई- ४०० ००१.
तारीख: १७ फेब्रुवारी, २०२६

वाचा :-

१) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र. १३३/२००७ मधील दि.२५.११.२०२५ रोजीचे आदेश.

प्रस्तावना :-

आदिवासी भागामध्ये असलेल्या सोयी सुविधांच्या अभावामुळे आरोग्य सेवा पुरविण्यासाठी वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे आदिवासी भागातील आरोग्य संस्थांमधील पदे दीर्घ काळासाठी रिक्त राहतात. परिणामी आदिवासी भागामध्ये रूग्णसेवा पुरविण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत. आदिवासी भागामध्ये वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र धोरण अवलंबण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय :-

आदिवासी भागामध्ये अपुऱ्या सोयी सुविधामुळे आरोग्य सेवा पुरविण्यासाठी वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे दीर्घ कालावधीसाठी पदे रिक्त राहतात. आदिवासी भागातील आरोग्य संस्थांमधील पदे दीर्घ काळासाठी रिक्त राहू नयेत यासाठी आदिवासी भागामध्ये वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्यासाठी खालीलप्रमाणे धोरण अवलंबण्यास शासन मान्यता देण्यात येत आहेत.

१. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून येथून पुढे नवीन भरती करताना व सेवांतर्गत पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्रथम आदिवासी भागात नियुक्ती देण्यात येवून सर्व पदे भरण्यात येतील. त्यानंतरच बिगर आदिवासी भागातील पदे भरण्यात येतील.

२. आदिवासी भागात काम करणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना तीन वर्षे सेवा केल्यानंतर पसंतीच्या ठिकाणी त्यांच्या विनंतीनुसार बदली देण्यात येईल.

३. आदिवासी भागातून बदली करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जागेवर बदली झालेला अधिकारी/ कर्मचारी व्यक्ती हजर होत नाही तोपर्यंत कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या पदावरून कार्यमुक्त करण्यात येणार नाही.

४. सेवा कालावधीत आदिवासी क्षेत्रात सेवा न केलेल्या वैद्यकीय अधिकारी यांना नियमित/तात्पुरत्या पदोन्नतीने प्राधान्याने आदिवासी क्षेत्रात नियुक्ती देण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दी.नि.केंद्रे)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) आयुक्त, आरोग्य सेवा व कु.क.तथा संचालक, रा.आ.अ, आरोग्य भवन,मुंबई.

२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)- १, महाराष्ट्र, मुंबई.

3) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)- २, महाराष्ट्र, नागपूर.

४) महालेखापाल, लेखापरीक्षा- १, महाराष्ट्र, मुंबई.

५) महालेखापाल, लेखापरीक्षा- २, महाराष्ट्र, नागपूर.

६) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, मुंबई

७) उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ (सर्व)

८) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)

१०) जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)

११) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)

१२) निवडनस्ती (सेवा-१).